मुरगाव एज्युकेशन सोसायटीचे

## एम.ई.एस.कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, जुआरीनगर, गोवा

आयोजित

# मराठी समाजशास्त्र परिषदेचे २८ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. २ व ३ फेब्रुवारी २०१८

# 'भारतातील पर्यटन आणि विकास : समस्या आणि चिंतन'

शोधनिबंध
।।स्मरणीका।।

संपादक
प्राचार्य डॉ. आर.बी.पाटील



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

225

Scanned with CamScanner

| अ.क्र. | लेखक | शोधनिबंधाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- | --- |
| 44 | प्रा.राजकुमार भगत | नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प एक पर्यटन | 53 |
| 45 | प्रा. नंदलाल भिमराव वर्डे | पर्यटन: ही एक विकासाची दिशा | 54 |
| 46 | प्रा. किशन काशिनाथ घोगरे | नांदेड जिल्ह्यातील पर्यटन स्थळे : समाजशास्त्रीय अभ्यास | 55 |
| 47 | प्रा.डॉ.लालचंद किसन रामटेके | पर्यटन विषयाचे आर्थिक व राजकीय पैलु | 56 |
| 48 | प्रा.डॉ. सरोज आगलावे | भारताच्या सुवर्णकाळातील बौद्ध पर्यटनस्थळे | 57 |
| 49 | डॉ. श्रीनिवास एन. पिलगुलवार | महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासात पर्यटनाची भूमिका | 58 |
| 50 | प्रा.डॉ. विठ्ठल चव्हाण | पर्यटन आणि विकास एक दृष्टिक्षेप | 59 |
| 51 | प्रा.बी.बी. वाळके | पर्यटन आणि पर्यावरण | 60 |
| 52 | प्रा. अनिल बी. वानखडे | पर्यटन आणि पर्यावरणाच्या समस्या व उपाय | 61 |
| 53 | डॉ. डी.जी. म्हशाखेत्री | भारतातील पर्यटन आणि विकासात्मक दृष्टिकोण | 62 |
| 54 | डॉ. राहुल भगत | पर्यटन आणि विकासात्मक दृष्टिकोन | 63 |
| 55 | प्रा. महेंद्र कुंभारे | DEVELOPMENTAL APPROACH OF TOURISM IN INDIA | 64 |
| 56 | प्रा. नवनाथ एस. शिंदे | भारतातील पर्यटन आणि परकीय चलन प्राप्ती | 65 |
| 57 | डॉ. बानायत गांधी | पर्यटन आणि विकासात्मक दृष्टिकोण | 66 |
| 58 | प्रा.डॉ. रामेश्वर एम. मोरे | भारतातील पर्यटन स्थिती आणि व अर्थव्यवस्थेतील पर्यटनाचे महत्त्व | 67 |
| 59 | प्रा. व्ही.एम. सुर्यवंशी | भारतातील पर्यटन आणि विकास : समस्या आणि चिंतन | 68 |




Scanned with CamScanner

# 49

# महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासात पर्यटनाची भूमिका

डॉ.श्रीनिवास एन. पिलगुलवार
समाजशास्त्र विभागप्रमुख,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा,
जि. चंद्रपुर
ईमेल: snpilgulwar@gmail.com मोबाईल: ९८५०३८७२७६

---

पर्यटन म्हणजे प्रवास, इंग्रजी भाषेतील 'टूरिझम (Tourism), या संज्ञेचा हा पर्याय आहे. इंग्रजी भाषेत 'टूरिस्ट (Tourist), म्हणजे 'पर्यटक, ही संज्ञा 'ट्रॅव्हलर (Traveller), 'प्रवाशी, या शब्दा ऐवजी १९ व्या शतकारंभी वापरण्यात येऊ लागली. आधुनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उदयोग म्हणून विकसित झाल्याचे दिसून येते. देशातील व परदेशातील पुराणवस्तू, इतिहास प्रसिद्ध व निसर्गरम्य स्थळे, प्राचीन कला निर्मितीची केंद्रे, पवित्र तीर्थक्षेत्रे, मोठ-मोठे कारखाने व इतर प्रकल्प इत्यादीचे आकर्षण ही पर्यटनामागील मुख्य प्रेरणा होय. ही प्रेरणा सार्वत्रिक व सर्वकालीन असली तरी आधुनिक काळातील ज्ञानप्रसाराची व दळण-वळणाची सुलभ साधने विकसित झाल्याने आधुनिक काळात पर्यटन उदयोगास विशेष चालना मिळत आहे. पर्यटन हे आवडीचा वेळ घालविण्याचे एक साधन म्हणूनही जगभरात अतिशय लोकप्रिय झाले आहे. २० व्या शतकाच्या अखेरीस आलेल्या जागतिक मंदीने व $H_1N_1$ फ्लूच्या साथीने २००८ च्या मध्यापासून ते २००९ च्या अखेरपर्यंत रोडावलेल्या पर्यटनाला परत बरे दिवस आले असून, २०१२ मध्ये जागतिक पर्यटकाच्या संख्येने १०० कोटीचा पल्ला इतिहासात पहिल्यांदा ओलांडला आहे. जागतिक पातळीवरील पर्यटनातून मिळणा-या उत्पन्नात खूप वाढ झाली आहे. २०११ मध्ये पर्यटनाच्या उत्पन्नातून वेग-वेगळ्या देशांना १.०३ लाख कोटी अमेरिकन डॉलर म्हणजे (७४ हजार कोटी यूरो) इतके उत्पन्न मिळाले आहे. ते २०१० च्या उत्पन्नाच्या तुलनेत ३.८ टक्के एवढे आहे. अलीकडील काळात पर्यटन हा उदयोग जागतिक स्तरावर देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे महत्वपूर्ण साधन म्हणून समोर येत आहे. २०१२ मध्ये चीन हा देश जगातील पर्यटनांवर सर्वात जास्त खर्च करणारा देश बनला आहे. चीनने अमेरिका आणि जर्मनीलाही या बाबतीत मागे टाकले आहे. चीन आणि तत्सम उदयोन्मुख राष्ट्रांचा पर्यटनावरील खर्च अलीकडील काळात वाढला आहे. ज्यामुळे देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासास चालना मिळत आहे.



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

2.28

Scanned with CamScanner

# महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासात पर्यटनाची भूमिका

Dr. Shrinivas N. Pilgulwar
Head of Dept. Sociology
Lokmanya Mahavidyalaya,
Warora, Dist. Chandrapur
Email ID: snpilgulwar@gmail.com
Mob: 9850387276

## ➢ प्रस्तावनाः—

पर्यटन म्हणजे प्रवास, इंग्रजी भाषेतील 'टूरिझम (Tourism)' या संज्ञेचा हा पर्याय आहे. इंग्रजी भाषेत 'टूरिस्ट (Tourist)' म्हणजे 'पर्यटक' ही संज्ञा 'ट्रॅव्हलर (Traveller)' 'प्रवासी' या शब्दा ऐवजी 19 व्या शतकारंभी वापरण्यात येऊ लागली. आधुनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाल्याचे दिसून येते. देशातील व परदेशातील पुराणवस्तू , इतिहास प्रसिद्ध व निसर्गरम्य स्थळे, प्राचीन कला निर्मितीची केंद्रे, पवित्र तीर्थक्षेत्रे, मोठ—मोठे कारखाने व इतर प्रकल्प इत्यादींचे आकर्षण ही पर्यटनामागील मुख्य प्रेरणा होय. ही प्रेरणा सार्वत्रिक व सर्वकालीन असली तरी आधुनिक काळातील ज्ञानप्रसाराची व दळण—वळणाची सुलभ साधने विकसित झाल्याने आधुनिक काळात पर्यटन उद्योगास विशेष चालना मिळत आहे. पर्यटन हे सवडीचा वेळ घालविण्याचे एक साधन म्हणूनही जगभरात अतिशय लोकप्रिय झाले आहे. 20 व्या शतकाच्या अखेरीस आलेल्या जागतिक मंदीने व H₁N₁फ्लूच्या साथीने 2008 च्या मध्यापासून ते 2009 च्या अखेरपर्यंत रोडावलेल्या पर्यटनाला परत बरे दिवस आले असून, 2012 मध्ये जागतिक पर्यटकांच्या संख्येने 100 कोटींचा पल्ला इतिहासात पहिल्यांदा ओलांडला आहे. जागतिक पातळीवरील पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नात खूप वाढ झाली आहे. 2011 मध्ये पर्यटनाच्या उत्पन्नातून वेग—वेगळ्या देशांना 1.03 लाख कोटी अमेरिकन डॉलर म्हणजे (74 हजार कोटी यूरो) इतके उत्पन्न मिळाले आहे. ते 2010 च्या उत्पन्नाच्या तुलनेत 3.8 टक्के एवढे आहे. अलीकडील काळात पर्यटन हा उद्योग जागतिक स्तरावर देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे महत्वपूर्ण साधन म्हणून समोर येत आहे. 2012 मध्ये चीन हा देश जगातील पर्यटनावर सर्वात जास्त खर्च करणारा देश बनला आहे. चीनने अमेरिका आणि जर्मनीलाही या बाबतीत मागे टाकले आहे. चीन आणि तत्सम उद्योन्मुख राष्ट्रांचा पर्यटनावरील खर्च अलीकडील काळात वाढला आहे, ज्यामुळे देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासास चालना मिळत आहे.

21 व्या शतकाच्या दूसऱ्या दशकात आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक उत्पादन व देशाच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) लक्षणीय भर घालण्यात महत्वपूर्ण सहभाग पर्यटन उद्योगाने नोंदविला आहे. 21 व्या शतकात उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत म्हणूनही विकसित देश पर्यटन उद्योगाकडे पाहत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन संघटनेच्या एका अहवालातून आपणास जागतिक स्तरावर बाजारात किती महत्वपूर्ण सहभाग पर्यटन उद्योगाचा आहे हे पुढील काही आकडेवारी वरुन समजून येते. 2013 मध्ये यूरोप पर्यटन उद्योगाचा बाजारातील एकूण हिस्सा 52 टक्के, आशिया महाव्दीपाचा 23.0 टक्के, अमेरिकेचा 16.4 टक्के, मध्य—पूर्व देशांचा केवळ 3 टक्के तर आफ्रिकन देशांमध्ये 3.15 टक्के आढळून आला आहे. (UNWTO-may 2014) वरील आकडेवारी वरुण आपणांस असे निदर्शनास येते की विकसित देशात पर्यटन उद्योगाचा बाजारपेठेवर विशेष प्रभाव असून त्यातून देशाच्या आर्थिक व पर्यायाने सामाजिक विकासास विशेष सहकार्य मिळत आहे. 2013 मध्ये जगाच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) पर्यटन उद्योगाचा 9 टक्के हिस्सा राहीला आहे, तसेच पर्यटन उद्योगामुळे 2 कोटी 60 लाख लोकांना नोकऱ्याही मिळाल्या असून याचे प्रमाण जागतिक स्तरावरील एकूण रोजगारांपैकी 11 पैकी 1 असे आहे.



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, War
Dist. Chandrapu

Scanned with CamScanner

भारतामध्येही पर्यटनामुळे देशाच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) भर पडत आहे. इतर देशाच्या तूलनेत भारतातही पर्यटन उदद्योगाच्या संधी विपूल प्रमाणात आहेत. 2012 मध्ये भारताच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) 2 टक्के म्हणजे 919 कोटी 70 लाख रु. चा वाटा पर्यटन उदद्योगाचा आहे. 2023 पर्यंत तो 8 टक्के राहील असे भाकीत सरकारने केले आहे. जगातील महत्वपूर्ण आणि प्रेक्षणीय पर्यटन स्थळांसारखे अनेक ठिकाण भारतात आहेत. जसे सहारा वाळवंटाचा अनुभव पर्यटकांना राजस्थानमध्ये घेता येतो. स्वीत्झरलँडमधील हिम पवर्तीय पर्यटनाचा अनुभव हिमाचल प्रदेश, काश्मीरमध्ये घेता येतो. आफ्रिकन जंगलातील जंगल सफारीचा अनुभव काझीरंगा, ताडोबा, जिम कॉर्बेट इ. अभयारण्यातून घेता येतो. म्हणजेच भारतातील पर्यटन उदद्योगातून अधिक आर्थिक उत्पन्न प्राप्त करता येते. त्या दिशेने भारतीय पर्यटन मंत्रालय व इतर संबंधीत यंत्रणा भारतातील पर्यटन उदद्योगाच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहेत. ज्यांचा उद्देश हा देशाच्या GDP मध्ये पर्यटन उदद्योगाचा सहभाग हा अधिक वाढला पाहिजे हा आहे. भारतामध्ये सुद्धा परदेशी पर्यटकांची संख्या दिवसें-दिवस वाढत आहे. 2007 मध्ये भारतात 50 लाख 80 हजार परदेशी पर्यटकांनी वेग-वेगळ्या राज्यातील प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या होत्या. त्यात 2013 मध्ये वाढ होऊन ती संख्या 69 लाख 84 हजारावर गेली आहे (India Tourism Statistics 2013-ministry of tourism).परदेशी पर्यटकांची वाढती संख्या हे भारतातील व महाराष्ट्रातील पर्यटन उदद्योगाच्या विकासास गती प्राप्त करुन देत आहे.

## ➢ पर्यटनाच्या परिभाषाः–

1. **ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोषाच्या** मते, "पर्यटक म्हणजे जो करमणूक व मनोरंजनाच्या हेतूने संस्कृतीचा आनंद घेण्यासाठी राहलीला जातो (1933 : 190)".
2. **लेपरच्या** मते, "पर्यटनाचे व्यवस्थापन आणि करमणूक त्यांचे वेग-वेंगळ्या प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते. जसे पर्यटनाच्या व्यवस्थापनाचा संबंध दिर्घकालीन सुट्ट्यांशी येतो ज्या उलट करमणूकीसाठी एका रात्रीच्या मुक्कामाची पण गरज नसते (1976:4)".
3. **ऑस्ट्रीयन अर्थशास्त्रज्ञ हर्मन व्ही. स्कूलंड** यांच्या मते, "वेग-वेगळ्या कृतींनी मिळून पर्यटनाचे व्यवस्थापन तयार होते. ज्यांचा मुख्यत्वे करुन अर्थविषयक गुणधर्माशी संबंध येतो. पर्यटकांचा पर्यटनात शहर, प्रदेश आणि देश यांच्यातील हालचालींशी आतुन व बाहेरुन जवळचा संबंध येतो (1990)".
4. **कोहेन** यांच्या मते, "आंतरराष्ट्रीय पर्यटन समाजशास्त्रीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने आनंदाच्या अपेक्षेने केलेला ऐच्छिक आणि तात्पूरता प्रवास असतो (1978)".

## ➢ पर्यटनाची ऐतिहासिक पार्श्वभूमीः–

मानवाने प्राचीन काळापासून स्वदेशातील अज्ञात प्रदेश तसेच परदेशातील प्रेक्षणीय स्थळे पाहण्याच्या उदि्दष्टांनी मनमुराद स्वैर भटकंती केली असल्याचे दिसून येते. प्राचीन काळी ग्रीस व रोम येथील अनेक लोक ज्ञान आणि मनोरंजन अशा दुहेरी हेतूंनी जवळपासच्या तसेच दूरदूरच्या परदेशात गटागटांनी प्रवास करीत असत. मध्ययुगात आणि नतंरच्या काळातही युरोप व आशिया खंडातील बहुसंख्य यात्रिक खिस्ती तसेच मुस्लिम धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी समूदायाने प्रवास करीत असत. पश्चिमी प्रबोधन काळात एकूनच जीवनविषयक दृष्टीकोन हा इहलोकनिष्ठ होऊ लागला व सांस्कृतिक, ऐतिहासिक कला-वाङ्मयीन नव्या जुन्या निर्मिती बद्दल नवे आकर्षण निर्माण झाले. त्यातून सर्वसामान्य लोकांमध्ये सहली आणि पर्यटन याविषयी आस्था व आवड वाढीस लागली. 18 व्या शतकात संपूर्ण यूरोप खंडाची सफर करणे हा इंग्रज व्यक्तींच्या सर्वांगीण शिक्षणाचा एक अविभाज्य भाग मानला जात असे. आर्थिकदृष्ट्या ऐपत असलेल्या व्यक्ती असा प्रवास आवर्जून करीत असत. 19 व्या शतकात प्रवासाच्या व वाहतूकीच्या साधनात जस-जशा सुधारणा होत गेल्या, तस-तसा पर्यटन उदद्योग भर-भराटीला येऊ लागला. सुसंघटित व नियोजनबद्ध सहलीची लोकप्रियता वाढत गेली. 19 व्या शतकात **टॉमस कुक** (1808-1892) या इंग्लीश पर्यटन व्यवसायिकाने मोठ्या प्रमाणात बहुसंख्य प्रवाशांसाठी रेल्वे सहली आयोजित केल्या. त्यांनी 600 लोकांची **लिसेस्टर** ते **लॅपबरो** ही



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

31

Scanned with CamScanner

रेल्वे सहल आयोजित केली. महाप्रदर्शन (1851), पॅरिस प्रदर्शन (1855) पाहण्यासाठी त्यांनी बहुसंख्य प्रवाशांच्या प्रचंड सहली आयोजित केल्या. यूरोपची भव्य सहल (1856) यशस्वीपणे घडवून आणली. त्यांनी टॉमस कुक अॅन्ड सन्स् (1864) ही यूरोपमधील पहीली पर्यटन संस्था स्थापन केली. अशाप्रकारे पर्यटन व्यवसायाची सुनियोजित व पद्धतशीर बांधणी करण्याचे श्रेय कुक यांच्याकडे जाते.

"आधूनिक भारतात 1980 च्या दशकात पर्यटनाच्या वास्तविक विकासास सुरुवात झाली. 1980 च्या नंतर सत्तेवर आलेल्या सर्व सरकारांनी आपल्या पद्धतीने पर्यटनाच्या विकासासाठी प्रयत्न केले आहेत. भारतात पर्यटनाच्या विकासासाठी 1982 मध्ये राष्ट्रीय पर्यटन धोरण घोषित करण्यात आले. पर्यटनाच्या क्षेत्रातील शाश्वत व व्यापक विकासासाठी 1988 मध्ये एका राष्ट्रीय समितीची स्थापना करण्यात आली. पर्यटनाचा राष्ट्रीय कृती आराखडा 1992 मध्ये तयार करण्यात आला. ज्याचा उद्देश हा देशातील पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी मुलभूत सोयी सुविधांच्या निर्मितीसाठी प्राधान्य देण्यात आले पाहिजे हा होता. भारतातील पर्यटनाच्या संवर्धनासाठी 1996 मध्ये योजना तयार करण्यात आली. 1997 मध्ये भारतात नवीन पर्यटन धोरण केंद्र सरकारने जाहीर केले. ज्यात केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या नियंत्रणी खालील सरकारी संस्था आणि खाजगी संस्थाच्या पर्यटन विकासातील भूमिका निश्चित करण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर स्थानिक स्वराज्य संस्था, गैर शासकीय संघटना, स्थानिक संस्था आणि युवक इ. चा पर्यटन उद्योगातील सहभाग अधिकाधिक वाढविण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. भारतात 1989 मध्ये पर्यटन महामंडळाची स्थापना केली. ज्याचा मुख्य उद्देश पर्यटना संबंधीच्या कार्यांना वित्तीय सहाय्यता उपलब्ध करुन देणे हा आहे. अशा महामंडळ व संस्थाच्या निर्मितीमुळे भारतातील पर्यटन विकासाला गती प्राप्त होत आहे (द्विवेदी:योजना:2015)".

## ➢ साहित्य परिक्षणः—

1. **सावंत माधुरी (2017)** —पर्यटनाचा मानवाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर कसा प्रभाव पडतो याचा अभ्यास आपल्या शोध—निबंधात सावंत यांनी केला आहे. पर्यटनाच्या विकासामुळे पर्यटन क्षेत्रातील मानवांच्या जीवनस्तरात अमुलाग्र स्वरूपाचे परिवर्तन होते असे मत सावंत आपल्या अध्ययनात मांडतात. पर्यटनाचा रोजगार, कुटीरद्योग, हस्तकला, संस्कृती संवर्धन, एकात्मता, सामाजिक संबंधात वाढ, पर्यटन क्षेत्रातील मालमत्तांच्या किमतीत वाढ, स्वयंरोजगारात वृद्धी, देशाच्या सकल घरेलू उत्पादनात वृद्धी इ. घटकांवर कसा परिणाम झाला हे डॉ. सावंत यांनी "Socio-Econo-mic Impacts of Tourism development at Aurangabad District" या आपल्या शोध—निबंधात स्पष्ट केले आहे".(सावंत:2017)
2. **ब्रुमारु पि. ए. आणि ए. एम. टॉलस (2011)**—यांनी **'पर्यटनाचे समाजशास्त्र'** या विषयावर आपला एक शोध—निबंध 2011च्या आंतरराष्ट्रीय नियतकालीका मध्ये प्रकाशित केला आहे. त्यांच्या मते, समकालीन परिप्रेक्षात जर पर्यटनाच्या समाजशास्त्राचा अभ्यास करायचा असेल तर तीन मुख्य घटकांवर अधिक लक्ष केंद्रीत करावे लागले. त्यात पर्यटनाचे स्त्रोत, पर्यटन उद्योगातील जोखीम आणि पर्यटनाचा समाजशास्त्रीय घटना म्हणून अध्ययन करावे लागेल. ते पूढे असे म्हणतात की, हे सर्व घटक परस्पर संबंधीत व परस्पर पूरक आहेत. (Brumaru & Talos:2011).
3. **महाराष्ट्र पर्यटन धोरण (2016)** —महाराष्ट्र शासनाने आपल्या राज्यातील पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी आपले पर्यटन धोरण 2016 मध्ये जाहीर केले आहे. महाराष्ट्र सरकार पर्यटनाच्या माध्यमातून राज्याच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) वृद्धी करण्याचा कसा प्रयत्न करीत आहे. हे या धोरणाच्या माध्यमातून स्पष्ट होते. तसेच राज्य सरकारच्या पर्यटन धोरणामुळे रोजगार, कुटीरद्योग, पर्यावरण संवर्धन, सांस्कृतिक देवाण घेवाण, हस्तकला संवर्धन, चित्रकला, स्वयंरोजगारात वाढ इ. मध्ये कशी वाढ होणार आहे व त्यातून राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासास कशी चालना मिळणार आहे हे या धोरणातून स्पष्ट होत आहे. (महाराष्ट्र राज्य :2016)



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waro
Dist. Chandrapur



Scanned with CamScanner

> अध्ययन पद्धती:–

कोणत्याही संशोधकाला संशोधन करायचे असेल तर ते संशोधन वैज्ञानिक पद्धतीच्या आधारावरच करावे लागते. वैज्ञानिक पद्धतीमध्ये रिथत ज्या काही संशोधनाच्या अध्ययन पद्धती आहेत. त्यातल्या काही तंत्राचा किंवा घटकाचा अवलंब करून संशोधन कार्य पार पाडावे लागते. वैज्ञानिक अध्ययन पद्धतीच्या अभावा पायी केले गेलेले संशोधन हे संशोधन नसते तर ते केवळ माहीतीचे एकत्रीकरण असते. म्हणून प्रस्तूत शोध निवंधासाठी व्दितीयक तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी भारतीय पर्यटन मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, शासनाचे पर्यटनाशी संबंधीत इतर अहवाल, ऐतिहासिक कागदपत्रे, अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित –अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इतर संशोधकाचे संशोधन इ.चा आधार घेण्यात आला आहे.

> अध्ययनाचे क्षेत्र:–

संशोधकाला आपले अध्ययन वस्तूनिष्ठ, वैज्ञानिक पद्धतीवर आधारीत, तटस्थ व तार्कीक ठेवण्यासाठी तसेच अध्ययन वेळेत पूर्ण करण्यासाठी अध्ययनाचे क्षेत्र निश्चित करावे लागते. संशोधकाचे अध्ययनाचे क्षेत्र बृहद असेल तर अध्ययनास अधिक वेळ लागण्याची शक्यता असते आणि संशोधक कमी वेळात अध्ययन पूर्ण करून संशोधनाला उचित न्याय देईल याची शाश्वती नसते. म्हणून संशोधक अध्ययनाचे क्षेत्र बृहद ठेवण्या ऐवजी अनेकदा सुक्ष्म ठेवण्याचा प्रयत्न करतो. कारण सुक्ष्म किंवा मर्यादीत अध्ययन क्षेत्रामुळे संशोधकाला वेळेत अध्ययन पूर्ण करून श्रम, वेळ, पैसा याची बचत करता येते. अध्ययनाचे क्षेत्र जर मर्यादीत असेल तर अधिक वस्तूनिष्ठ निष्कर्ष काढणे संशोधकाला सहज शक्य होते. म्हणून प्रस्तूत शोध–निबंधासाठी संशोधकांनी दुय्यम तथ्यांच्या आधारावर संशोधन करायचे असल्यामुळे महाराष्ट्र राज्य हे अध्ययनाचे क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे.

> अध्ययनाचे उद्देश :–

1. पर्यटनाची ऐतिहासिक पार्श्वभुमी जाणून घेणे.
2. पर्यटनाची महाराष्ट्राच्या आर्थिक विकासातील भूमिका अभ्यासणे.
3. पर्यटनाची महाराष्ट्राच्या सामाजिक विकासातील भूमिका अभ्यासणे.

> गृहीत कृत्ये :–

1. मध्ययुगीन काळापासून पर्यटनाला ऐतिहासिक व व्यावसायिक महत्व प्राप्त झाले आहे.
2. पर्यटन उद्योग हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण भूमिका पार पाडीत असून, त्यात सुधारणेला अधिक वाव आहे.
3. पर्यटन उद्योगाच्या विकसनशील स्थितीमूळे महाराष्ट्राच्या सामाजिक विकासास चालना मिळत आहे.

> विश्लेषणात्मक निर्वचन :–

अलिकडील काळात देशांतर्गत सर्व राज्य आपल्या प्रदेशातील पर्यटन उद्योगांकडे अधिक लक्ष देण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचे कारण म्हणजे राज्याच्या आर्थिक विकासात पर्यटन उद्योग महत्वाची भूमिका पार पाडीत आहे. पर्यटन उद्योगांमुळे सेवा उद्योगांना महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. पूर्वी वस्तू व त्यांचे उत्पादन, वितरण व उपभोग हेच दिर्घकाळ आर्थिक विश्लेषणाचे प्रमुख चर्चा विषय होते. याचा परिणाम म्हणून केंद्र व राज्य सरकारांचे सेवा उद्योगांकडे दुर्लक्ष झाले होते. अलिकडील काळात सेवा उद्योगातून बऱ्याच मोठया स्वरूपात महसूल केंद्र व राज्य सरकारांना प्राप्त होत आहे. सेवा क्षेत्रातून सरकारला मिळणारे उत्पन्न इतर क्षेत्रातील सरकारच्या गुंतवणूकीच्या तूलनेत मिळणाऱ्या उत्पन्ना पेक्षा कितीतरी अधिक पटीत आहे. त्यामूळे सर्व राज्य सरकारांचे सेवा क्षेत्राच्या विस्ताराकडे अधिक लक्षकेंद्रीत होत आहे. पर्यटनाच्या निमित्ताने देशात–परदेशात होणारी माणसांची वाढती वर्दळ व हालचाली यांमूळे सेवा क्षेत्राला एकूण उत्पादनाच्या वर्तूळात महत्वाचे स्थान प्राप्त होऊ लागले आहे. पर्यटनामुळे व्यापाराचे प्रमाण व परिणाम यांचा



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Wara
Dist. Chandrapur

233

Scanned with CamScanner

विस्तार झाला. हिमाच्छादीत पर्वतशिखरे, निर्मनुष्य समुद्रकिनारा, निर्मनुष्य वनप्रदेश अशा एकेकाळी उपेक्षणीय असणाऱ्या गोष्टी जेथे लोक काही काळापूर्वी जाणे सत्कीचीतही पसंत करत नव्हते. त्या घटकांचा आज पर्यटन क्षेत्रात समावेश केल्या जात आहे. लोकांच्या आवडीचे ते ठिकाण बनत आहेत. अशा पर्यटन स्थळांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होत आहे.

I

पर्यटनामुळे जो प्रत्यक्ष पैसा मिळतो त्याही पेक्षा राष्ट्रीय उत्पन्नातील गुणक परिणाममुळे जी भर पडते, किंवा पर्यटकांच्या खर्चाच्या उलाढालीमुळे त्यातून निर्माण होणाऱ्या पैशाची जी भर पडते, त्याचे महत्व अधिक असते. याचे स्पष्टीकरण पूढीलप्रमाणे करता येईल. पर्यटनावर पैशाचा जो प्रत्येक एकक खर्च होत असतो. तो सबंध अर्थव्यवस्थेत फिरत राहतो आणि त्यायोगे त्याच्याशी ज्या–ज्या लोकांचा संबंध येत राहतो त्याचा वाढीव प्रमाणात फायदा होत राहतो. अर्थशास्त्रज्ञांनी पर्यटनाचा गुणक परिणाम भारताच्या बाबतीत 3.5 एवढा काढला आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर एका पर्यटकाचा एक रूपया खर्च झाल्यावर त्यायोगे अर्थव्यवस्थेमध्ये 3.5 रूपये किमतीची उलाढाल होते. आंतरराष्ट्रीय पर्यटना प्रमाणेच देशांतर्गत म्हणजेच राज्या–राज्यातील पर्यटनाचाही देशाच्या आर्थिक स्थितीवर अनूकुल परिणाम होत असतो. मात्र याबाबतची आकडेवारी आंतरराष्ट्रीय पर्यटनाप्रमाणे सुलभ प्रमाणात मिळू शकत नाही. याचे कारण म्हणजे म्हणावे तसे गंभीर लक्ष पर्यटन व्यवसायाकडे अनेकदा राज्य सरकारे देत नाहीत. परंतू अलिकडील काळात यात सकारात्मक बदल होत आहे. संशोधकांच्या ढोबळ अंदाजाप्रमाणे देशांतर्गत पर्यटनामुळे जी आर्थिक उलाढाल निर्माण होते. ती आंतरराष्ट्रीय पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या उलाढालीच्या 10 पटीने अधिक असते

II

देशांतर्गत 'पर्यटनात महाराष्ट्र हा सुद्धा बऱ्याच वरच्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्यात दरवर्षी देशाच्या विविध प्रांतातून 6 कोटी आणि परदेशातून सुमारे 20 लाख पर्यटक येतात. देशातील वेगवेगळ्या राज्यातून येणाऱ्या 6 कोटी पर्यटकां पैकी 1 कोटी 50 लाख पर्यटक हे अजिंठा, वेरूळ आणि मुंबईला भेट देतात. 20 लाख परदेशी पर्यटकां पैकी 3 ते 4 लाख पर्यटक महाराष्ट्रातील पंढरपूर, शिर्डी, पैठण, शनि शिंगणापूर इ. धार्मिक पर्यटनांना भेटी देतात. हे पर्यटक मुख्यतः ऐतिहासिक स्थळे पाहण्यासाठी आणि व्यवसायिक कारणाने महाराष्ट्रातील इतर शहरांनाही भेटी देतात. परदेशी पर्यटकांचे 1990 पासून शैक्षणिक कारणांसाठी भारतात येण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यातही महाराष्ट्राचा क्रमांक सर्वात वरचा आहे. भारतात पूणे विद्यापीठात सर्वाधिक जास्त परदेशी विद्यार्थी शिक्षण घेतात. इ.स. 2000 पासून वैद्यकीय उपचारासाठी भारतात परदेशी पर्यटकांचे येण्याचे प्रमाण वाढत आहे. याचे कारण म्हणजे इतर देशांच्या तूलनेत भारतातील वैद्यकीय सुविधा परदेशी व्यक्तींना स्वस्तात मिळतात. वैद्यकीय उपचारासाठी महाराष्ट्रात येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या लक्षणीय आहे. (Wikipedia.org.) 1990 नंतर दळणवळण आणि रस्ते विकासाला महाराष्ट्रात चालना मिळली. पर्यटकांसाठी खाजगी वाहतूक कंपन्या पुढे आल्या. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेतही बरीचशी सुधारणा झाली आहे. ज्यामुळे महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाला गती प्राप्त होत आहे.

III

महाराष्ट्र हे राज्य भारतातील इतर राज्यांच्या तूलनेत अनेक बाबींमध्ये वेगळेपणा दर्शविणारे आहे. महाराष्ट्र हे देशात क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ 307713 कि. मी. एवढे आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने देशात दुसरा क्रमांक असून 2011 च्या जनगणनेनूसार 11,23,72,972 एवढी आहे. 720 कि.मी. चा सागुद्री किनारा महाराष्ट्राला लाभला आहे. एकूण 36 जिल्हे, 357 तालुके व जवळपास 28 हजार ग्रामपंचायती, 6 प्रशासकीय विभाग आहेत. त्यात नागपूर, अमरावती, पूणे, नाशिक, कोकण, औरंगाबाद हे होत. महाराष्ट्र हे राज्य सांस्कृतिक दृष्ट्या विविधतेने नटलेले आहे. येथे अनेक सण आणि उत्सव मोठ्या आनंदाने साजरे केले जातात. अशा उत्सवांसाठी परदेशी व स्वदेशीय परराज्यातील अनेक पर्यटक महाराष्ट्रात येतात. कोकणातील गणपती उत्सव, मुंबईतील दहीहंडी उत्सव, नागपूरचा बडगा



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waro
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

उत्सव इ. उत्सवांसाठी परदेशी व स्वदेशी पर्यटक महाराष्ट्रात येतात. महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटनालाही परदेशी व स्वदेशी पर्यटक येत असतात. उदाः–पंढरपूर, शिर्डी, पैठण, शनि शिंगणापूर, शेगांव, देहु, आळंदी, त्र्यंबकेश्वर, ज्योर्तिलिंग, निसर्ग व वन पर्यटन इत्यादीलाही परदेशी व स्वदेशातील पर्यटक पसंती देतात. निसर्ग व वनपर्यटनात महाबळेश्वर, माथेरान, चिखलदरा, लोणावळा, ताडोबा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, पेंच अभयारण्य, नवेगाव अभयारण्य इ. व्यतिरिक्त पर्यटक कोकणा मधील समुद्र किनारा, मुंबईतील जुहू चौपाटी, औरंगाबादमधील अजिंठा व एलोरा येथील जगप्रसिद्ध लेण्या इत्यादींसाठी महाराष्ट्रात येतात. पर्यटकांच्या येण्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.

## IV

महाराष्ट्र हे राज्य भारताच्या आर्थिक विकासात नेहमीच महत्वाची भूमिका पार पाडीत असते. भारताच्या एकूण औद्योगिक उत्पादनापैकी 21 टक्के उत्पन्न महाराष्ट्रात होते. देशाच्या सकल घरेलू उत्पादनात महाराष्ट्राचा 13 टक्के हिस्सा आहे. देशातील एकूण निर्माण होणाऱ्या औद्योगिक रोजगारापैकी केवळ मुंबई या एका शहरातून 13.7 टक्के रोजगार निर्माण केला जातो. ज्यात पर्यटनावर आधारीत रोजगारही निर्माण केला जातो. म्हणून मुंबईला भारताची आर्थिक राजधानी असे संबोधले जाते. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात उद्योग, सेवा, कृषी इ. मुख्य घटकांचा महत्वाचा वाटा आहे. 2012 च्या एका आर्थिक सर्वेक्षणाव्दारे उद्योग आणि सेवा क्षेत्राचे महाराष्ट्राच्या आर्थिक उत्पन्नातील योगदान 89 टक्के एवढे आहे. ज्यात सेवा क्षेत्र म्हणून पर्यटन उद्योगाचाही समावेश होतो. कृषी आणि इतर क्षेत्राचे राज्याच्या उत्पन्नात केवळ 11 टक्के योगदान आहे. महाराष्ट्र राज्यात पर्यटन व्यवसायाच्या आणि पर्यटन विकासाच्या विपूल प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. महाराष्ट्रात ऐतिहासिक जगप्रसिद्ध लेण्या, वास्तू, गुंफा, तीर्थक्षेत्रे, निसर्ग पर्यटन, वन पर्यटन, उद्योग पर्यटन, समुद्री किनारा पर्यटन, साहसी पर्यटन इ. पर्यटनाच्या प्रकाराला व्यापक व विस्तृत प्रमाणात वाव आहे. महाराष्ट्र राज्यातील पर्यटनाच्या समग्र विकासाची जबाबदारी राज्य शासनाने महाराष्ट्र पर्यटनविकास मंडळाकडे (MTDC) दिली आहे. MTDC ची स्थापना महाराष्ट्र सरकारने 1956 च्या कंपनी कायद्यानूसार सरकारी उपक्रम म्हणून 1975 ला केली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाला राज्य सरकारने राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास, नियंत्रण, सोयी–सुविधा उपलब्ध करून देणे, पर्यटन स्थळांचा दर्जा (उदा. अ,ब,क,ड) ठरविणे, त्यानूसार तिथे व्यवस्था निर्माण करणे, पर्यटनाचे धोरण ठरविणे व त्याची अमंलबजावणी पर्यटन व सांस्कृतिक मंत्रालयाच्या माध्यमातून करणे, परदेशी व इतर राज्यातील पर्यटकांना पर्यटनासाठी आकर्षित करणे इ. सारख्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. ऑक्टोबर 2014 मध्ये महाराष्ट्र राज्यात मा. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेवर आले. त्यांनी पर्यटन मंत्रालयाची जबाबदारी श्री. जयकुमार रावल आणि श्री. मदनभाऊ येरावार या मंत्रीव्दयींवर सोपविली आहे. महाराष्ट्र सरकारने पर्यटनासारख्या उद्योगातून महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात भविष्यात महत्वाची भूमिका पार पाडणाऱ्या या सेवा क्षेत्रासाठी 'Maharashtra Tourism policy-2016' या नावाने धोरण जाहीर केले आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील पर्यटनाच्या विकासासाठी 2016 चे धोरण ठरविले आहे. त्यात त्यांनी काही उद्दिदेष्टये ठरविली आहेत त्याचा थोडक्यात आढावा आपणांस घेता येईल. पर्यटन विकासाच्या माध्यमातून नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करणे, देशाच्या एकूण पर्यटन व्यवसायातील राज्याची भागीदारी 7 टक्क्यांवरून 10 टक्क्यांपर्यंत नेणे, पर्यटनउद्योगातून मिळणाऱ्या सकल घरेलू उत्पादनाचा (GDP) वाटा 15 टक्क्यांपर्यंत नेणे, राज्याच्या पर्यटन उद्योगात सन. 2025 पर्यंत नवीन पर्यटन व्यवसाय उद्यमीकडून 30000 करोड रूपयांची गुंतवणूक करणे, 2025 पर्यंत पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून 10 लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करणे, पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून पर्यटन स्थळांच्या विकासासाठी BOT (Build, Operate, Transper ), PPP (Public, Private, Partnership), CSR (Corporate Social Responsibility) इ. ना प्राधान्य देणे, अशा प्रकारे महाराष्ट्र राज्याने आपले 2016 ला पर्यटन धोरण जाहीर केले. याचा सकारात्मक परिणाम



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगावर पडत आहे. याचा परिणाम म्हणून राज्याच्या आर्थिक व पर्यायाने सामाजिक विकासास चालना मिळत आहे. (MTDC:2016)

V

.जागतिक स्तरावरील महत्वपूर्ण व्यापारांपैकी पर्यटन हा एक व्यवसाय आहे. अनेक विकसित देशांचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत म्हणूनही पर्यटन उद्योग महत्वाची भूमिका पार पाडीत आहे. सद्यस्थितील विश्व सकल घरेलू उत्पादनामध्ये (World Gross Domestic Product) पर्यटन उद्योगाचा हिस्सा 9 टक्के इतका आहे. महाराष्ट्रामध्ये अलिकडील काही वर्षात पर्यटन उद्योगाच्या वाढत्या प्रस्थामुळे विकासाच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. पर्यटनामुळे राज्याच्या महसूलात भर पडत आहे. महाराष्ट्र शासनाने पर्यटन उद्योगात थेट परकीय गुंतवणूकीला (FDI) मान्यता दिल्यामुळे सन. 2012 मध्ये 7000 कोटी रूपयांची गुंतवणूक या व्यवसायात झाली. अशा गुंतवणूकीमुळे 95 पर्यटनाचे प्रकल्प महाराष्ट्रात सुरू करण्यात आले, ज्यातून हजारो कुशल व अकुशल कामगारांना रोजगार प्राप्त होत आहे. अशा गुंतवणूकीच्या मार्गाने राज्य सरकार हॉटेल्स, रेस्टॉरन्ट, रिसॉर्ट इ. ची निर्मिती करित आहे. महाराष्ट्रात साधारणतः दरवर्षी 25 लाख परदेशी पर्यटक येतात. हे प्रमाण राज्यात येणाऱ्या एकूण पर्यटकां पैकी 2 टक्के एवढे आहे. परदेशी पर्यटकांमुळे राज्याला परकीय चलन प्राप्त होते. महाराष्ट्रात येणाऱ्या परदेशी पर्यटकां पैकी जवळपास 4 लाख पर्यटक हे मुंबईचे पर्यटन करण्यासाठी येतात. परदेशी पर्यटकांचे महाराष्ट्रात येण्याचे प्रमाण इतर राज्याच्या तुलनेत कमी आहे. त्यात वाढ करण्यासाठी सरकारला प्रयत्न करणे गरजेचे आहे. देशांतर्गत म्हणजे भारतातील राज्या–राज्यातील लोक देशातील वेग–वेगळ्या राज्यात पर्यटनाला किती प्राधान्य देतात हे पाहणे पण आवश्यक आहे. कारण पर्यटकांच्या भेटीमुळेच राज्यातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळत असते. महाराष्ट्र व इतर राज्यातील देशांतर्गत पर्यटनाची काय स्थिती आहे. हे भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या एका अहवालातील तक्त्यावरून आपणास अधिक योग्य रीतीने स्पष्ट करता येईल.

तक्ता क्रमांक 1

भारतातील प्रमुख 10 राज्यातील घरेलू पर्यटकांची स्थिती दर्शविणारा तक्ता

| श्रेणी | राज्य/केंद्रशासित प्रदेश | घरेलू पर्यटक | |
|---|---|---|---|
| | | एकूण पर्यटकांची संख्या | टक्केवारी |
| 1. | आंध्रप्रदेश | 206817895 | 20.0 |
| 2. | तामिळनाडू | 184136840 | 17.8 |
| 3. | उत्तर प्रदेश | 168381276 | 16.2 |
| 4. | कर्नाटक | 94052729 | 9.1 |
| 5. | महाराष्ट्र | 66330229 | 6.4 |
| 6. | मध्यप्रदेश | 53197209 | 5.1 |
| 7. | राजस्थान | 28611831 | 2.8 |
| 8. | उत्तराखंड | 26827329 | 2.6 |
| 9. | गुजरात | 24379023 | 2.4 |
| 10. | पश्चिम बंगाल | 22730205 | 2.2 |
| | एकूण | 875464566 | 84.5 |
| | इतर राज्य/केंद्रशासित प्रदेश | 160882091 | 15.5 |
| | एकूण | 1036346657 | 100 |

स्त्रोतः–India Tourism Market Research Division-2013.

उपरोक्त तक्त्यातील आकडेवारीवरून आपणांस असे निदर्शनास येते की, घरेलू पर्यटकांच्या श्रेणीत आंध्रप्रदेशाचा पहिला क्रमांक लागतो. देशाच्या एकूण पर्यटकांपैकी 20 टक्के पर्यटक हे आंध्रप्रदेश मध्ये पर्यटनाला जातात. त्यानंतर तामिळनाडूचा दुसरा क्रमांक लागतो. तामिळनाडूत 18 टक्के पर्यटक पर्यटनासाठी जातात. हे दोन्ही राज्य दक्षिण भारतातील आहेत हे विशेष. आंध्रप्रदेश व तामिळनाडू मध्ये जे पर्यटक जातात



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

ते धार्मिक पर्यटनासाठी तिरूपती बालाजी, श्रीशैलम, रामेश्वरम, बलिपूरम इ. हिंदूच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेले धार्मिक पर्यटन तिर्थक्षेत्र या दोन्ही राज्यात असल्यामुळे तिथे पर्यटक अधिक जातात. वरील तक्त्यात महाराष्ट्राचा 5 वा क्रमांक असून महाराष्ट्रात देशातील 6.4 टक्केच पर्यटक येतात. हे प्रमाण महाराष्ट्रा सारख्या पर्यटनात समृद्ध असणाऱ्या राज्यासाठी निश्चितच भूषणावह नाही. यासाठी महाराष्ट्र सरकारला विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. पर्यटन उद्योगाच्या वाढीमुळे अनेक आर्थिक फायदे राज्य सरकारला होतात. महाराष्ट्र सरकारलाही अलिकडील काही वर्षात पर्यटन व्यवसायात केलेल्या गुंतवणूकीचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. वेग–वेगळ्या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी नवीन व्यवसायाला चालना मिळत आहे. परदेशी पर्यटकांच्या राज्यातील पर्यटनागुळे परकीय चलन प्राप्त होत आहे. राज्यातील महाबळेश्वर, लोणावळा, नाशिक, शिर्डी, पंढरपूर, इ. सारख्या पर्यटन स्थळांमुळे राज्यातहॉटेल्स, रेस्टॉरंट व रिसॉर्ट च्या माध्यमातून सेवा क्षेत्राच्या विकासास चालना मिळत आहे. राज्यात येणाऱ्या पर्यटकांमुळे राज्यातील लघुउद्योग व कुटीर उद्योगाला चागंले दिवस येत आहेत. (उदा:– पैठणी, वारली कला, हस्तकला, बांबू पासून बनविलेल्या वस्तू इत्यादींच्या विक्रीत वाढ होत आहे.) निसर्ग व वन पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळत आहेत. तसेच त्यांच्या जीवन स्तरात वाढ होत आहे. .(उदा:–ताडोबा अभयारण्यामुळे स्थानिक आदिवासींना रोजगार मिळत आहे. आदिवासी बांबुपासून वस्तू बनवून पर्यटकांना विकत आहेत.) पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून राज्य सरकारच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) वाढ होत आहे. महाराष्ट्र राज्याकडे सर्व प्रकारचे पर्यटन वैभव उपलब्ध असून राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे म्हणावा तसा फायदा पर्यटनाचा सरकारला घेता आला नाही, असे अध्ययनावरून दिसून येते. जर महाराष्ट्राला राज्यातील परदेशी पर्यटकांचे येण्याचे प्रमाण 2 टक्के व देशांतर्गत येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण जे 6 टक्के आहे त्यात वाढ करून राज्याचा आर्थिक विकास साधायचा असेल तर पर्यटन उद्योगाच्या विकासाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

## VI

आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या राष्ट्रांमध्ये पर्यटनाचा विकास झाला आहे. तिथे सामाजिक विकासास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. पर्यटनाच्या विकासामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. एका संशोधनाच्या अहवालानूसार 2010 मध्ये जगात पर्यटनाच्या माध्यमातून 21,98,10,000 जणांना रोजगार प्राप्त झाला आहे. हे प्रमाण जगातील एकूण रोजगाराच्या स्थितीशी तूलना केली तर प्रत्येक 11 रोजगारां पैकी 1 रोजगार हा पर्यटन क्षेत्रातील रोजगार म्हणून आपणांस दिसून येईल. म्हणजेच लक्षणीय स्वरूपात रोजगार प्राप्ती ही पर्यटनाच्या क्षेत्रातून निर्माण होत आहे. 2013 च्या World Travel and Tourism Council (WTTC) च्या एका आकडेवारीवरून भारतामध्ये 3,94,20,500 लोकांना म्हणजेच देशातील एकूण रोजगाराच्या 7.6 टक्के प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष तसेच तात्पूरत्या स्वरूपात किंवा कायम स्वरूपाचा रोजगार पर्यटनातून मिळाला आहे. भारत सरकारचे 2023 पर्यंत पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून भारतात 48592000 म्हणजे एकूण रोजगाराच्या 8 टक्के रोजगार निर्माण करण्याचे उद्दिदष्टय आहे. महाराष्ट्रातील पर्यटनाच्या विकासामुळे, सुद्धा पर्यटनाकडे श्रम प्रधान सेवा उद्योग म्हणून पाहिल्या जात आहे. भारतासारख्या विकसनशिल देशामध्ये मोठ्या संख्येने श्रमीकांची उपलब्धता असल्याने बेकारांच्या हाताला काम देऊन सामाजिक विकासास चालना देणे हे पर्यटन उद्योगामुळे शक्य होत आहे. पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून महाराष्ट्रात अनेक लोकांना रोजगार प्राप्त होतो. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या एका आकडेवारी नूसार महाराष्ट्रात पर्यटनाच्या माध्यमातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ढोबळ मानाने दरवर्षी 2 लाख लोकांना रोजगार प्राप्त होतो. त्यात काही लोकांना वर्षभराचा कायम स्वरूपी तर काही लोकांना हंगामी स्वरूपात प्राप्त होतो. महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्या (MTDC) 2016 च्या धोरणानूसार 2025 पर्यंत महाराष्ट्रात पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून 10 लाख नवीन नोकऱ्या निर्माण करण्याचे उदिष्ट्य महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन मंत्रालयाने निश्चित केले आहे. हे उदिष्ट प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने या क्षेत्रात 2025 पर्यंत 40 हजार कोटींच्या गुंतवणूकीचे उदिष्ट निर्धारीत केले आहे. महाराष्ट्र शासनाने आपले पर्यटन क्षेत्राच्या विकासा संबंधीचे आपले धोरण बदलविले आहे. पर्यटन स्थळाचे प्रकार निश्चित करून तिथे व्यवसाय करणाऱ्या



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warc
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

लोकांना अनेक सोयी–सुविधा सरकार मार्फत पुरविल्या जात आहेत. व्यवसायिकांना करांमध्ये सूट देण्यात येत आहे. ही सूट काही पर्यटन स्थळांना 100 टक्के पर्यतची आहे. सरकार सर्व प्रकारातील पर्यटन स्थळांच्या विकासात मुलभूत सोयी–सुविधांच्या विकासास प्राधान्य देत आहे. विकासासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील गुंतवणूकीला प्राधान्य दिलेजात आहे. पर्यटनाच्या होणाऱ्या प्रगतीमुळे पर्यटन क्षेत्रातील लोकांच्या जीवन स्तरात सकारात्मक बदल होत आहे. स्थानिकांना पर्यटनांमुळे रोजगार मोठ्या प्रमाणात मिळत आहे. उदाः महाबळेश्वर जवळील शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरीच्या शेतीतून रोजगार व आर्थिक प्राप्ती होत आहे. पर्यटनाच्या विकासामुळे परिसरातील मुलभूत सुविधांमध्ये वाढ होत आहे. पर्यटकांच्या आगमनामुळे स्थानिक व पर्यटक यांच्यातील सामाजिक संबंध दृढ होत आहेत. पर्यटनाच्या विकासामुळे संस्कृतीच्या हस्तांतरणास व संवर्धनास चालना मिळत आहे. तसेच सांस्कृतीक देवाण–घेवाण वाढीस लागत आहे. पर्यटनामुळे ऐतिहासिक वास्तूचे जतन होत आहे. पर्यटनाच्या विकासामुळे शाश्वत व चिरंतन विकासास चालना मिळत आहे.

➢ **अध्ययनाचे निष्कर्ष :–**

1. प्राचीन काळी पर्यटनाचा उद्देश ज्ञान प्राप्ती व मनोरंजन हा होता तो आता केवळ मनोरंजन असा राहीला आहे.
2. प्राचीन काळी पर्यटन करणे हे श्रीमंताचे काम समजले जात असे. अलिकडील काळात मध्यम व सामान्य वर्गातील लोकांचे पर्यटनाचे प्रमाण वाढले आहे.
3. 19 व्या शतकात टॉमस कुक च्या माध्यमातून जगात व्यावसायिक पर्यटनाला सुरूवात झाली.
4. मध्ययुगीन काळापासून पर्यटनाला ऐतिहासिक व व्यावसायिक महत्व प्राप्त झाले आहे.
5. 1990 च्या दशकात भारतातील पर्यटन व्यवसायाच्या विकासाला चालना मिळाली.
6. भारतातील पर्यटनाच्या विकासात शासकीय व गैर–शासकीय संघटनांची भूमिका महत्वाची ठरत आहे.
7. देशांतर्गत पर्यटनामुळे बाजारपेठां मधील आर्थिक व्यवहारांच्या उलाढालीस चालना मिळत आहे.
8. महाराष्ट्रात येणाऱ्या परदेशी पर्यटकां पैकी सर्वाधिक पर्यटक मुंबई, पूणे, औरंगाबाद येथे येतात.
9. 1990 च्या नंतर महाराष्ट्रात शैक्षणिक व वैद्यकीय कारणांसाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या सर्वाधिक जास्त आहे.
10. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सहकार्यामुळे राज्यातील पर्यटनाच्या विकासास गती मिळत आहे.
11. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात उद्योग, सेवा व कृषी इ. क्षेत्राचा वाटा 89 टक्के एवढा आहे.
12. देशांतर्गत पर्यटनात महाराष्ट्राचा 5 वा क्रमांक आहे.
13. महाराष्ट्र सरकारच्या 2016 च्या पर्यटन धोरणाचा सकारात्मक परिणाम होत आहे.
14. महाराष्ट्राच्या पर्यटन व्यवसायात थेट परकीय गुंतवणूक वाढत आहे.
15. भारतात एकूण येणाऱ्या परदेशी पर्यटकांपैकी केवळ 2 टक्के पर्यटकच महाराष्ट्रात येतात.
16. महाराष्ट्र राज्यातील पर्यटन व्यवसायामुळे राज्याच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) वाढ होत आहे.
17. पर्यटनामुळे राज्याच्या सेवा क्षेत्राच्या विकासास चालना मिळत आहे.
18. पर्यटनामुळे राज्यात नवीन व्यवसायाला चालना मिळत आहे.
19. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत.
20. पर्यटन व्यवसाय देशाच्या व राज्याच्या परकीय गंगाजळीच्या वाढीस सहाय्यक ठरत आहे.
21. राज्यातील पर्यटन उद्योगात सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या गुंतवणूकीस चालना मिळत आहे.
22. पर्यटनांमुळे स्थानिकांच्या मुलभूत सुविधांमध्ये व जीवन स्तरातवाढ होत आहे.
23. पर्यटनामुळे संस्कृती संवर्धन व सांस्कृतीक देवाण–घेवाण होत आहे.
24. पर्यटनामुळे ऐतिहासिक वास्तूचे जतन होत आहे.
25. पर्यटनामुळे राज्यातील शाश्वत व चिरंतन विकासास चालना मिळत आहे.



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

38

Scanned with CamScanner

## ➢ शिफारशी :–

1. विकसित देशातील पर्यटन उद्योगांसारखा व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून भारतातील पर्यटन उद्योगाचा विकास करण्याची गरज आहे.
2. पर्यटन उद्योगातील मुलभूत सुविधांवर अधिक खर्च करण्याची गरज आहे.
3. परराज्यातील पर्यटकांची संख्या राज्यात अधिक संख्येनी यावी यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.
4. महाराष्ट्रात गड–किल्ल्यांच्या पर्यटनाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.
5. परदेशी पर्यटकांचे राज्यात पर्यटनाचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे.
6. राज्याच्या 2016 च्या पर्यटन धोरणाची अमंलबजावणी तटस्थपणे होणे गरजेचे आहे.
7. पर्यटन उद्योगातील थेट परकीय गुंतवणूकीसाठी राज्य सरकारला विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.
8. पर्यटन उद्योगातून हंगामी रोजगारा ऐवजी कायम स्वरूपी रोजगार निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
9. पर्यटन उद्योगात स्थानिकांना अधिक संख्येने सहभागी करून घेण्याची गरज आहे.
10. पर्यटन उद्योगातून शाश्वत व चिरंतन विकास अधिकाधिक प्रमाणात कसा होईल यावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.
11. पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून लघु व कुटीर उद्योगास चालना देण्याची गरज आहे.

## ➢ संदर्भ ग्रंथ :–


1. Brumaru P.A. & A.M. Talos (2011), *Sociology of Tourism*, CINQCONTINENTS, Vol 1, (ISSN- 2247-2290), *p184-193.*
2. Cohen E. (1978), *Contemporary Tourism, Diversity & Change*, Sage Publication.
3. Cohen E. (1984), *The Sociology Of Tourism: Approaches, Issues & Findings*, Annual Review of Sociology, Jerusalem, Israel.
4. Govt. of Maharashtra (2016), *Maharashtra Tourism policy-2016*, Ministry Of Tourism, Govt. of Maharashtra,may-2016.
5. Govt. of Maharashtra (2016), *Maharashtra Tourism Development Corporation.*
6. Govt. of India (2013), *India Tourism Market Division*, Ministry of Tourism.
7. Jaswal S.S. (2014), *Role of Tourism Industry in India's Development*,Tourism & Hospitality,(Vol-3, Issue-2), ISSN-2167-0269, *p 2-9.*
8. Leiper N. (1976), *New Theory of TheLeisure Class*, Schocken Books, New York, *p 4.*
9. Oxford English Dictionary (1933), *Oxford English Dictionary*,Oxford University Press,New Portland, p *190.*
10. Schullard V.H. (1990), *Tourism Planning & Developmental Issues*, Caliners Books.
11. Sawant M. (2017), *Socio-Economic Impacts of Tourism Development at Aurang District*, Research Gate Publication.
12. आगलावे प्रदिप (2008), सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
13. व्दिवेदी धिप्रज्ञ (2015), पर्यावरण परिस्थितीकी और पर्यटन योजना, मई–2015.
14. यादव संतोष (2002), पर्यावरण–पर्यटन समस्यांए और सम्भावनाए,योजना, अगस्त–2002.
15. फडणवीस मृणालिनी (2013), विदर्भ पर्यटन–सुवर्ण आशा, श्री रेणूका प्रकाशन, नागपूर.
16. www.incredibleindia.org
17. www.wikipedia.org
18. www.ijssr.org
19. www.gov.maha.org
20. www.yojna.org
21. www.mygov.org
22. www.mtdc.org



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur




39

Scanned with CamScanner